

देगलूर : देगलूर महाविद्यालयात वाचक दिन साजरा करण्यात आला.

# देगलूर महाविद्यालयात वाचन दिन साजरा

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्यावतीने कोविड - १९ आरोग्य विभागाच्या सर्व नियमांचे पालन करुन ता.१९ जून हा 'वाचन दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी ग्रंथालय चळवळीचे पी. एन. पनिक्कर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रंथप्रदर्शन व ग्रंथाचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी यावेळी प्रा. डॉ. जंबाले, प्रा. डॉ. चोले, तसेच कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी, ग्रंथपाल प्रा. शिंदे, प्रा. उत्तमकुमार कांबळे, पाटील, प्रा. कुलकर्णी, सहायक ग्रंथपाल नाईक, कर्णे, संगमकर, नंदू बिडवई, बालाजी माळेगावकर, बालाजी गोविंदवार आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.